रयत शिक्षण संस्थेचे,

अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर

अर्थशास्त्र विभाग

विभाग अहवाल

२०२४-२५

दिनांक ०४/११/२०२५

शै. वर्ष २०२४-२५ अर्थशास्त्र विभागाने आपल्या उज्वल निकालाची परंपरा कायम राखत B.A चा निकाल ८४.६१ % तर M.A चा १००% आहे. विभागात नव्याने B.A II साठी ११ विद्यार्थ्यांनी तर M.A – I १७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या शैक्षणिक वर्षात प्रा. कांबळे एम.बी, M.A. SET हे नव्याने रुजू झाले.

अर्थशास्त्र विभाग व नियोजन मंडळाच्या संयुक्त विद्यमाने नियोजन मंडळाचे उद्घाटन दिनांक ३० ऑगस्ट २०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे 'बँकिंग अँड फायनान्स' या विषयाच्या अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. श्रीकांत फुलसुंदर यांच्या हस्ते झाले. सदर प्रसंगी त्यांनी "भारतीय अर्थव्यवस्थे समोरील आव्हाने" या विषयावर मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी ९७ विद्यार्थी आणि पाच प्राध्यापक उपस्थित होते.

महाविद्यालयीन स्तरावरील अविष्कार स्पर्धेत विभागातील ०९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यापैकी चार विद्यार्थ्यांची निवड बारामती येथे संपन्न झालेल्या विभागीय पातळीवरील अविष्कार स्पर्धेसाठी झाली. सदर स्पर्धेत या विद्यार्थिनीनी "सेवा क्षेत्रातील महिलांना वाढथ्या रोजगाराच्या संधी" या विषयावर संशोधन पर पोस्टर प्रदर्शित केले.

अर्थशास्त्र व वाणिज्य विभागाअंतर्गत एक दिवशीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन १ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात आले. परिषदेचा विषय "**RECENT ADVANCES IN GLOBAL MANAGEMENT, COMMERCE AND ECONOMICS" (RAGMCE-2025)** हा होता. त्यात ६२ प्राध्यापकांनी १७७ संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. ४९ संशोधन पेपर प्राप्त झाले. सदर पेपरचे प्रोसोडिंग करून ऑनलाईन व ऑफलाईन प्रकाशन करण्यात आले.

विभागाअंतर्गत क्षेत्र भेट कार्यक्रम दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता. सदर क्षेत्र भेटीचे ठिकाण नारायणगाव येथील **कृषी विज्ञान केंद्र** हे होते. या क्षेत्र भेटीसाठी १५

विद्यार्थी आणि ४ शिक्षकांनी सहभाग नोंदवला. याच दरम्यान नारायणगाव येथील महाविद्यालयाने आयोजित केलेल्या अंदाजपत्रक २०२४-२५ च्या कार्यशाळेत सहभाग नोंदवला.

इंडस्ट्रियल व्हिजिट अंतर्गत दिनांक ४ मार्च २०२५ रोजी मंचर परिसरातील वीट भट्टी, नर्सरी व भाग्यलक्ष्मी दूध डेअरी या ठिकाणी भेटी देऊन सदर प्रकल्पांचा अभ्यास करण्यात आला. यात २० विद्यार्थ्यांनी व ४ प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला.

विभागातील प्रा. कांबळे एम.बी व प्रा. सालके एस.आर यांना सिडमणी प्रोजेक्ट अंतर्गत रुपये वीस हजार रुपयाची शिष्यवृत्ती मंजुर झाली आहे. या प्रकल्प अंतर्गत “प्रधानमंत्री जनधन योजनेचा अल्प उत्पन्न गटातील लोकांवर झालेल्या आर्थिक व सामाजिक परिणामाचा अभ्यास” या विषयावर लघु संशोधन प्रकल्पावर काम करण्यात येत आहे.



क्षेत्र भेट अर्थशास्त्र विभाग



इंडस्ट्रियल व्हिजिट भाग्यलक्ष्मी दूध डेअरी



अर्थशास्त्र विभाग- अविष्कार -२०२४-२५



नियोजन मंडळाचे उद्घाटन - प्रमुख वक्ते डॉ. फुलसुंदर, विभाग प्रमुख प्रा. सालके, प्रा. घोलप, प्रा. देसाई